महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

Rs.2/-

मुख्य संपादक : रविंद्र घोडविंदे ■ कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ १ सप्टेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०७० ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

## आर्थिक निकष आणि गुणवत्तेच्या आधारे आरक्षण हवे ! - आ. किसन कथोरे

### आरक्षणाच्या नावाखाली सामान्य लोकांचे होणारे हाल निंदनीय !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण: सामाजिक भेदाभेद नष्ट करणे आणि सर्व समाज उन्नती, विकासाचा मार्ग मोकळा करण्यासाठी आर्थिक निकष आणि गुणवत्ता याच आधारे येणाऱ्या काळात आरक्षण देणे ही काळाची गरज आहे. आरक्षणाच्या मागणीसाठी सामान्य लोकांना विविध प्रकारे वेठीस धरण्याचे आता सुरू असलेले प्रकार अतिशय निंदनीय आहेत, असे मत मुरबाड मतदारसंघाचे भाजप आमदार किसन कथोरे यांनी गणेशोत्सवानिमित्त दर्शन सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात व्यक्त केले.**

भारतीय संविधानाने सर्वंकश सामाजिक विकास साधण्यासाठी अधिकार आणि हक्काची चौकट निश्चित केली आहे. या चौकटीचे पालन करणे आवश्यक आहे. आता कोणीही उठतो आणि मनमानी पध्दतीने आरक्षणाची मागणी करतो. हे संविधानाच्या चौकटीला आव्हान देण्यासारखे आहे. स्वातंत्र्याची ७७ वर्ष झाली तरी आपण आरक्षणाच्याच वाटेवरून पुढे जाणार असू तर मग बौध्दिक क्षमता, गुणवत्ता, अंगभूत कौशल्ये या माध्यमातून आपण पुढे कधी जाणार, असा प्रश्न आमदार कथोरे यांनी केला.



> मराठा समाजाला आरक्षण मिळण्याच्या मागणीसाठी सध्या तीव्र आंदोलन सुरू आहे. धनगरांनाही आरक्षण हवे आहे. ओबीसी समाज अस्वस्थ आहे. आरक्षणासाठी प्रत्येक समाज आंदोलनाच्या पवित्र्यात आहे. त्यामुळे समाजात नाहक तेढ निर्माण होऊ लागली आहे. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेची भावना लोप पाऊ लागली आहे. अशाने देशाची शांतता आणि प्रगती धोक्यात येऊ शकते. केवळ एक समाज म्हणून विचार न करता संपूर्ण राष्ट्र म्हणून विचार करणे गरजेचे आहे. प्रत्येक जातीला अधिकाधिक प्रमाणात आरक्षण हवे आहे. सध्या मराठा आरक्षणावरून गदारोळ सुरू आहे. माझे याबाबत स्पष्ट मत आहे, की जातीच्या आधारे आरक्षण देणे आता बंद करावे. त्याऐवजी आर्थिक निकषावर गुणवत्तेच्या आधारे आरक्षण दिले जावे. त्यामुळे समाजातील गरजू आणि गुणवंत व्यक्तीला योग्य त्या शिक्षणाच्या आणि नोकरीच्या संधी मिळतील. त्यातून नवा विकसीत भारत घडेल.
>
> • किसन कथोरे, आमदार, मुरबाड विधानसभा.

एकीकडे आपण नवतंत्रज्ञानाच्या माध्यमातून विकासाच्या मोठ्या गप्पा मारायच्या. त्याच बरोबर उठसुठ आरक्षणासाठी आंदोलने करून रस्ते अडवायचे, लोकांना वेठीस धरायचे हे सर्व किती दिवस चालणार, असे प्रश्न आमदार कथोरे यांनी मुंबईत मराठा आरक्षणावरून सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर व्यक्त केले. काही विशिष्ट मागास जातींना समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांना शिक्षण, नोकरीमध्ये काही काळासाठी कालबध्द आरक्षणाचे धोरण ठेवले होते. हा समाज विकसित झाल्यानंतर ते आरक्षण रद्द होणे अपेक्षित होते. याउलट दिवसेंदिवस आरक्षणाची मागणी वाढत आहे. या माध्यमातून सामाजिक तेढ निर्माण होत आहे. आरक्षणामुळे राष्ट्रीय एकात्मतेची भावना लोप पावत आहे. आरक्षण हेच फक्त आपला विकास करू शकते, ही भावना समाज, राष्ट्र विकासाला अनंत काळासाठी मारक आहे, असे आमदार कथोरे यांनी सांगितले.

भारत एक महासत्तेच्या दिशेने प्रवास करत आहे. अनेक भारतीय विदेशात महत्वाच्या पदांवर काम करत आहेत. या सर्व गोष्टींचा विचार केला तर आता आरक्षण कायमस्वरुपी बंद करावे. आर्थिक निकष आणि गुणवत्तेच्या आधारे ज्यांना खरच गरज आहे त्यांनाच आरक्षण देण्यासाठी सरकारने पावले उचलावीत, असे आमदार कथोरे यांनी सांगितले. महाराष्ट्रात विदेशी गुंतवणूक होत आहे. रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होणार आहेत. या नवीन संधीसाठी तरूणांनी कौशल्यधारित प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे, असे आमदार कथोरे यांनी सांगितले.

**डोंबिवलीकर आंदोलन**

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत सुरू केलेल्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी डोंबिवलीतील सामाजिक कार्यकर्ते प्रा. शिवा अय्यर गेले आहेत. त्यांनी एका मराठी माणसाने सुरू केलेल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आपण एक मराठी माणूस म्हणून मुंबईत आलो असल्याचे सांगितले. मागील तीन महिन्याच्या काळात प्रा. अय्यर यांनी राज्यभर महाराष्ट्रीय पंतप्रधान झालाच पाहिजे या मागणीसाठी एक अभियान राबविले.

---

थोडक्यात महत्वाचे



## सुप्रसिद्ध अभिनेत्री प्रिया मराठे यांचे निधन

### कर्करोगासोबतची झुंज ठरली अपयशी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : लोकप्रिय मराठी अभिनेत्री प्रिया मराठे यांच्या निधनाचा कलाकारांसह चाहत्यांनादेखील धक्का बसला आहे. अभिनेत्री प्रिया मराठे यांचे आज, वयाच्या ३८ व्या वर्षी कर्करोगाने निधन झाले. त्यामुळे संपूर्ण कलाविश्वात शोक व्यक्त केला जात आहे.

प्रिया मराठे यांच्या अकाली निधनाने सर्वांनाच धक्का बसला आहे. तिने चार दिवस सासूचे, बडे अच्छे लगते है, पवित्र रिश्ता अशा गाजलेल्या मालिकांमध्ये महत्वपूर्ण भूमिका साकारल्या होत्या. त्यांच्या या भूमिका विशेष गाजल्या होत्या. प्रत्येत सादरीकरणातून त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर अविस्मरणीय ठसा उमटवला. त्यांच्या निधनामुळे सपूर्ण कलाविश्वातून हळहळ व्यक्त केली जात आहे. अनेक कलाकाल तसेच दिग्दर्शकांनी त्यांच्या सोशल मिडीयावर भावना व्यक्त केल्या आहेत.

## ठाणे जिल्ह्यात गौरीचे उत्साहात आगमन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : जिल्ह्यात गणपतीचे वाजत गाजत ढोलताशांच्या गजरात आगमन झाल्यानंतर, आज गौरींचे आगमन होत आहे. ठाणे जिल्ह्यात १५ हजार ३२७ गौरींचे आगमन होणार आहे. यामध्ये सर्वाधिक ६ हजार ५०२ गौरींचे कल्याण-डोंबिवली शहरात आगमन होणार आहे.

यंदा २७ ऑगस्ट रोजी गणपतीचे आगमन झाले. ठाणे जिल्ह्यात १ लाख ५७ हजार ८४२ गणपतीची उत्साहात प्रतिष्ठापना झाली. त्यापाठोपाठ, रविवारी गौरीचे आगमन होत आहे. गौरी आगमन हा गणेशोत्सवातील एक अत्यंत महत्त्वाचा आणि भावनिक क्षण असतो. गणपती बाप्पाच्या आगमनानंतर यंदा पाचव्या दिवशी म्हणजे गौरींचे आगमन होत आहे. काही ठिकाणी त्याला 'गौरी आवाहन', 'गौरी पूजन' किंवा 'गौरी आगमन' असेही म्हटले जाते.



## खंडित वीजपुरवठ्याचा टीएमटीला आर्थिक फटका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : खंडित वीजपुरवठ्याचा फटका इलेक्ट्रिक बसला बसत असून वीज नसल्यामुळे बसेस चार्जिंग करण्यास अडचण येत आहे. परिणामी बसेस रस्त्यावर येत नसल्याने प्रवाशांना देखील अडचणीचा सामना करावा लागला काही दिवसांपूर्वी मुसळधार पावसामुळे कोपरी येथील इलेक्ट्रिक बस चार्जिंग स्टेशनमध्ये बिघाड झाला होता. त्यानंतर शुक्रवारी सकाळपासून पुन्हा वीजपुरवठा खंडित झाल्याने परिणामी रस्त्यावर अतिशय तुरळक इलेक्ट्रिक बस धावल्याचे दिसून आले. शुक्रवारी रस्त्यावर १२३ पैकी ५४ आणि शनिवारी अवघ्या १७ बस रस्त्यावर धावल्या. ठाणे परिवहनच्या ताफ्यात ३५० च्या आसपास बस आहेत. त्यातील २१० बस या सीएनजी आणि डिझेलवर धावणाऱ्या बस आहेत, तर नव्याने परिवहनच्या ताफ्यात १२३ इलेक्ट्रिक बस दाखल झाल्या आहेत.

ठाणे पूर्व येथील या इलेक्ट्रिक बस डेपोत चार्ज केल्या जात आहेत. मागील ८ ते १० दिवसांपूर्वी सततच्या पावसाचा फटका याच इलेक्ट्रिक बसला आहे. त्यात शुक्रवारी चार्जिंग स्टेशन येथील स्टेबिलायझर खराब झाल्याने व महावितरणच्या केबलमध्ये देखील बिघाड झाल्यामुळे येथील वीजपुरवठा खंडित झाल्याचे सांगण्यात आले आहे. त्यानुसार तो सुरळीत करण्यासाठी शनिवारी सकाळपासून महावितरणचे पथक दाखल झाले. चार्जिंग अभावी बसेस डेपोत उभ्या असल्यामुळे जवळपास ४ ते ५ लाखांचे नुकसान झाल्याचे समजते.

---

## गोवेलीतील शमन कॅन्सर केअर रुग्णालय ग्रामीण भागातील रुग्णांसाठी वरदान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर येथील ५१ वर्षीय विमला टाकले यांच्या ओवरीवरील ५.४ किलो वजनाच्या कॅन्सरयुक्त ट्यूमरची जीवनरक्षक शस्त्रक्रिया शमन कॅन्सर केअर हॉस्पिटलमध्ये यशस्वीपणे पार पडली आहे. डॉ. झाकी आणि त्यांच्या सर्जिकल टीमच्या कुशल मार्गदर्शनाखाली झालेल्या या ऑपरेशनने विमलाच्या आयुष्याला नवे आयाम दिले आहेत.



शमन कॅन्सर केअर हे गोवेली येथील हॉस्पिटल कल्याण, डोंबिवली, टीटवाळा, अंबरनाथ बदलापूरयेथील ग्रामीण भागातील रुग्णांसाठी वरदान ठरले असून, या प्रकारच्या जटिल कॅन्सरच्या उपचारांसाठी सर्वप्रकारच्या आधुनिक सुविधा जसे कि रेडीएशन, किमोथेरपी आणि तज्ञ सर्जनांची टीम या ठिकाणी सहज उपलब्ध आहे. ग्रामीण आणि उपनगरांतून येणाऱ्या रुग्णांना मोठ्या शहरात न जाता घराजवळच उत्तमोत्तम उपचार मिळत असल्यामुळे या हॉस्पिटलचा लाभअनेकांनी घेतला आहे.

विमलाच्या यशस्वी शस्त्रक्रियेने हे स्पष्ट झाले की शमन कॅन्सर केअर हॉस्पिटल त्याच्या तज्ञ डॉक्टरांच्या कौशल्याने आणि आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे कॅन्सरच्या जटिल प्रसंगांमध्येही आशेचा किरण ठरू शकतो. ग्रामीण भागातील रुग्णांसाठी या प्रकारच्या उपचारांची उपलब्धता आणि परवडणाऱ्या किमतीत गुणवत्ता यामुळे शमन कॅन्सर केअर हे क्षेत्रातील अग्रगण्य केंद्र बनले आहे.

## केंद्रीय मंत्री जे.पी. नड्डा यांनी मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी घेतले गणेशाचे दर्शन



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, दि. 31 :** केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे.पी. नड्डा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी भेट देऊन श्री गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी केंद्रीय मंत्री नड्डा यांचे गणेश मूर्ती, शाल, श्रीफळ तसेच पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या मातोश्री सरीता फडणवीस, पत्नी अमृता फडणवीस तसेच श्री. नड्डा यांच्या कुटुंबातील सदस्य व इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



## सुप्रिया सुळेंच्या गाडीला मराठा आंदोलकांचा घेराव

### आंदोलकांची जोरदार घोषणाबाजी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मराठा समाजाला आरक्षण मिळावं, या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत आंदोलनाला सुरुवात केली आहे. मुंबईच्या आझाद मैदानावर उपोषण आंदोलन सुरू आहे. आज (३१ ऑगस्ट) आंदोलनाचा तिसरा दिवस आहे. या आंदोलनामध्ये महाराष्ट्रातील लाखो मराठा आंदोलक सहभागी झालेले आहेत. आझाद मैदानावर सुरू असलेल्या या आंदोलनाला अनेक राजकीय नेते भेटी देत आहेत.

आज राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आंदोलनाला भेट देत मनोज जरांगे पाटील यांच्या तब्येतीची विचारपूस केली. तसेच भेटीनंतर सुप्रिया सुळे पुन्हा परत जात असताना त्यांची गाडी आंदोलकांनी आडवली. यावेळी सुप्रिया सुळे यांच्या गाडीला आंदोलकांनी घेराव घालत गाडी पुढे जाऊ देण्यास नकार दिला आणि शरद पवारांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली.






## वाचक मनोगत

# वाहतूक कोंडी मोठी समस्या

रस्त्यांवरील वाढती वाहतूक कोंडी ही सध्याची मोठी समस्या बनली आहे. दिवस असो की रात्र, वेळ कोणतीही असो रस्ता कोणताही असो मुंबई, ठाणे, कल्याण, नवी मुंबई किंवा मुंबईतून कुठेही जाणारे राज्य - राष्ट्रीय महामार्ग सगळीकडे प्रचंड वाहतूक कोंडी दिसते. पूर्वी हे चित्र शनिवार, रविवार किंवा जोडून सुट्टया आलेल्या दिवशी व्हायची आता ती रोजच होती. या वाहतूक कोंडीने रस्त्यांवर वाहनांच्या रांगाच्या रांगा लागलेल्या असतात त्यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. ज्या प्रवासास पूर्वी एक ते दीड तास लागायचा त्याच प्रवासासाठी नागरिकांचा आता दुप्पट वेळ लागत आहे. सकाळ, संध्याकाळ यासारख्या पीक अवरमध्ये तर वाहने अगदी कासव गतीने धावतात. वाढत्या वाहन कोंडीमुळे शहरातील नागरिक त्रस्त आहे. ही वाहतूक कोंडी टाळण्यासाठी शासनाने उड्डाणपूल केले पण आता त्याच उड्डाणपुलावर वाहनांची कोंडी होताना दिसत आहे. अनेक प्रयत्न करूनही वाहतूक कोंडी कमी करण्यात प्रशासनाला यश येत नाही. वाढत्या वाहतूक कोंडीला अनेक कारणे आहेत त्यातील मुख्य कारण आहे ते म्हणजे वाहनांची वाढती संख्या. वाढत्या वाहतूक कोंडीला वाहनांची प्रचंड संख्या जबाबदार आहे. आज लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे. दरवर्षी त्यात हजारो वाहनांची भर पडते. वाढत्या वाहनांमुळे शहरातील रस्ते अपुरे पडू लागली आहे. वाढत्या वाहनांमुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली तशीच पार्किंगचीही मोठी समस्या निर्माण झाली आहे. मुंबईत गाड्या पार्क करण्यासाठी जी वाहनतळे आहेत त्यात साधारणपणे दहा हजारांच्या आसपास वाहने पार्क करता येतात परिणामी अवैध पार्किंगची संख्या वाढली आहे. पार्किंगची सोय नसल्याने नागरिक रस्त्यांच्या कडेला आपल्या गाड्या पार्क करतात त्यामुळेही वाहतूक कोंडी होते. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी शासन, प्रशासनाकडून नागरिकांना सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करण्याच्या सूचना दिल्या जातात. मात्र नागरिकांचा सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवरील विश्वास उडाला आहे. बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नागरिकांना सक्षम सेवा देण्यात अपयशी ठरत आहे म्हणून जो तो नवीन वाहन घेत आहे. नवीन वाहन विकत घेऊन नागरिक आपल्या खाजगी वाहनांनी प्रवास करत आहे. बेस्ट, पीएमपीएल सारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेने आपला कारभार सुधारून नागरिकांना चांगली सेवा द्यायला हवी. बेस्ट, पीएमपीएल सारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करण्याची जबाबदारी शासनाची आहे. शासनाने जर या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम केल्या तर नागरिक स्वतःच्या वाहनांनी प्रवास न करता सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचाच वापर करतील त्यामुळे रस्त्यावरील वाहनांची संख्या कमी होईल आणि वाहनाची संख्या कमी झाली की रस्त्यांवरील वाहतूक कोंडी देखील कमी होईल. जर रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी करण्याची शासन प्रशासनाची मनापासून इच्छा असेल तर त्यांनी आधी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करावी. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करूनच वाहतूक कोंडी रोखता येईल.

**श्याम ठाणेदार, दौंड**



# मराठा आंदोलकांसाठी ८०० स्वच्छता कर्मचारी

## आंदोलकांना पुरवण्यात येत असलेल्या सेवा सुविधा

**मराठा समाजबांधवांच्या मागण्यांच्या अनुषंगाने, बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयासमोरील आझाद मैदानावर आंदोलन सुरू आहे. या आंदोलनामध्ये सहभागी होण्यासाठी महाराष्ट्रभरातून आलेल्या आंदोलकांची संख्या लक्षात घेता, बृहन्मुंबई महानगरपालिकेने विविध नागरी सोयी-सुविधा पुरवल्या आहेत. पिण्याचे पाणी, प्रसाधनगृहे, स्वच्छता, आरोग्य यासह आवश्यक त्या सर्व पुरवण्यात येत आहेत. सोयी-सुविधांमध्ये कमतरता राहू नये, यादृष्टिने अतिरिक्त अधिकारी, कर्मचारी, कामगार यांची देखील प्रशासनाने नियुक्ती केली आहे. महानगरपालिकेद्वारे पुरविण्यात येणाऱ्या सेवा-सुविधांच्या अनुषंगाने आंदोलनकर्त्यांनीही महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे, असे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनामार्फत करण्यात येत आहे. तसेच परिस्थितीचा आढावा घेत मोर्चेकऱ्यांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध होतील, याअनुषंगाने प्रशासन प्रयत्न करीत आहे.**

दिनांक 29 ऑगस्ट 2025 पासून आझाद मैदानावर मराठा समाजबांधवांचे आंदोलन सुरू आहे. त्यासाठी राज्यभरातून आलेल्या आंदोलकांची संख्या लक्षात घेता आझाद मैदान व परिसरामंध्ये आंदोलन नागरिकांना अत्यावश्यक, मूलभूत नागरी सेवा-सुविधा महानगरपालिकेच्या वतीने पुरवण्यात येत आहेत. तसेच दैनदिन कामकाजाच्या पलीकडे सद्यस्थितीतील पावसाळा तसेच सध्या सुरू असलेला श्रीगणेशोत्सव या पार्श्वभूमीवर मुंबईकर नागरिकांना महानगरपालिका प्रशासनाकडून पुरवण्यात येणाऱ्या सेवा-सुविधा सुरळीत राहाव्यात, यासाठी संपूर्ण यंत्रणा नियोजनबद्धरित्या तसेच अथकपणे कार्यरत आहे. याशिवाय ए विभाग कार्यालयासह परिमंडळ एक मधील सर्व विभाग कार्यालये, इतर संबंधित खाती यांच्याकडून योग्य ती कार्यवाही सुरू आहे.

दिनांक 29 ऑगस्ट 2025 पासून आझाद मैदानावर मराठा समाजबांधवांचे आंदोलन सुरू आहे. त्यासाठी राज्यभरातून आलेल्या आंदोलकांची संख्या लक्षात घेता आझाद मैदान व परिसरामंध्ये आंदोलन नागरिकांना अत्यावश्यक, मूलभूत नागरी सेवा-सुविधा महानगरपालिकेच्या वतीने पुरवण्यात येत आहेत. तसेच दैनदिन कामकाजाच्या पलीकडे सद्यस्थितीतील पावसाळा तसेच सध्या सुरू असलेला श्रीगणेशोत्सव या पार्श्वभूमीवर मुंबईकर नागरिकांना महानगरपालिका प्रशासनाकडून पुरवण्यात येणाऱ्या सेवा-सुविधा सुरळीत राहाव्यात, यासाठी संपूर्ण यंत्रणा नियोजनबद्धरित्या तसेच अथकपणे कार्यरत आहे. याशिवाय ए विभाग कार्यालयासह परिमंडळ एक मधील सर्व विभाग कार्यालये, इतर संबंधित खाती यांच्याकडून योग्य ती कार्यवाही सुरू आहे.

आंदोलकांसाठी पिण्याच्या पाण्याचे 25 टँकर्स उपलब्ध करून देण्यात आले आहेत. आवश्यकतेनुसार अतिरिक्त टँकर्स मागविले जात आहेत. आझाद मैदान, महापालिका मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानक, हुतात्मा स्मारक चौक, बॉम्बे जिमखाना, हज हाऊस, मरीन ड्राईव्ह पोलीस स्टेशन, एअर इंडिया इमारत, त्याचप्रमाणे येलो गेट, फ्री वेवर शिवडी, कॉटन ग्रीन वाहन तळ, वाशी जकात नाका अशा विविध ठिकाणी सदर टँकर पाणीपुरवठा करीत आहेत. मोर्चेकऱ्यांच्या सुविधेसाठी उपलब्ध करून देण्यात येणारे टँकर वाहतूक सेवेला अडथळा निर्माण होणार नाही, याअनुषंगाने सहकार्य करावे, असे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.

आंदोलनस्थळ व परिसरात सुमारे ८०० पेक्षा अधिक स्वच्छता कर्मचाऱ्यांमार्फत सातत्याने स्वच्छता केली जात आहे. त्यासाठी परिमंडळ 1 मधील ए, बी, सी, डी व ई या पाचही विभाग कार्यालयांमधून अतिरिक्त मनुष्यबळ आणून समर्पित कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. दोन सत्रांमध्ये स्वच्छता कर्मचारी आंदोलनकर्त्यांच्या सेवेत अविरतपणे कार्यरत आहेत. आंदोल कांना देखील महानगरपालिकेच्या वतीने कचरा संकलनासाठी थैल्या (डस्टबिन बॅग) मोठ्या संख्येने वितरित करण्यात येत आहेत. या थैल्यांमध्ये आंदोलकांनी कचरा टाकून तो महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांकडे सोपवावा, यासाठी सातत्याने आवाहन करण्यात येत आहे.

आंदोलकांची संख्या लक्षात घेता, आझाद मैदान परिसरात 24 तास कार्यरत वैद्यकीय मदत कक्षाची उभारणी करण्यात आली आहे. त्याद्वारे गरजुंना आरोग्य सेवा पुरवण्यात येत आहे. यात, ४ वैद्यकीय पथक आणि ४ रुग्णवाहिका मैदान परिसरात कार्यरत आहे. महानगरपालिकेच्या नायर रुग्णालयाकडून देखील याठिकाणी वैद्यकीय पथक नेमण्यात आले आहे. आवश्यकतेनुसार स्थिती हाताळण्यासाठी रुग्णांना गोकुळदास तेजपाल (जी.टी.) रुग्णालय, नायर रुग्णालय, कामा रुग्णालय, बॉम्बे रुग्णालय येथे संदर्भित केले जाईल. त्यादृष्टिने संबंधित रुग्णांशी समन्वय साधण्यात आला आहे. त्याचप्रमाणे, राज्य शासनाच्या माध्यमातून सेंट जॉर्ज रुग्णालय आणि जे.जे. रुग्णालय याठिकाणी रुग्णशय्या सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. राज्य शासनाच्या वतीने जे. जे. रुग्णालयाचे पथक देखील आझाद मैदान परिसरात नेमण्यात आले आहे.

आतापर्यंतचा विचार करता, सुमारे 1 हजार 37 आंदोलनकर्त्यांनी वैद्यकीय सुविधांचा लाभ घेतला आहे. आंदोलनकर्त्यांसाठी पुरेसा औषध साठा उपलब्ध करून देण्यात आला आहे. 108 रुग्णवाहिका सेवेच्या एकूण चार रुग्णवाहिका आंदोलनस्थळी उपलब्ध आहेत. आंदोलकांकरिता प्रसाधनगृहांची पुरेशी व्यवस्था करण्यात आली आहे. नियमित तसेच फिरती अशी दोन्ही प्रकारची प्रसाधनगृहे मिळून सुमारे 300 पेक्षा अधिक शौचकूपे होतील, इतकी व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात आली आहे. यामध्ये, आझाद मैदान व परिसरातील "पैसे द्या आणि वापरा" या तत्त्वावरील तसेच इतर सर्व सार्वजनिक शौचालये आंदोलकांच्या वापरासाठी मोफत उपलब्ध केली आहेत. मैदानात आतील बाजूस एकूण 29 शौचकूप असणारे शौचालय विनामूल्य उपलब्ध केले आहे. आझाद मैदानास लागून असलेल्या महात्मा गांधी मार्गावर प्रत्येकी 10 शौचकुपे असलेली 3 फिरती शौचालये उपलब्ध केली आहेत. मेट्रो साइट शेजारी 12 फिरती (पोर्टेबल) शौचालये उपलब्ध केली आहेत. तसेच, अतिरिक्त शौचालयांची सोय केली आहे. तर, फॅशन स्ट्रीट आणि आजूबाजूचा संपूर्ण परिसर मिळून 300 शौचकूपे असणारी फिरती शौचालये विनामूल्य वापरासाठी पुरवली आहेत. सर्व प्रसाधनगृहांमध्ये देखील नियमितपणे स्वच्छता केली जात आहे. पावसाळी परिस्थिती पाहता आझाद मैदान परिसरात कीटकनाशक धूम्रफवारणी सातत्याने केली जात आहे. त्यासाठी स्वतंत्र 2 पथके कार्यरत आहेत.

# सोनपावलांनी आली गौराई ...

## रायगड जिल्ह्यात १६ हजार १७५ गौराईचे आगमन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण (प्रतिनिधी)**

गणरायाच्या आगमनानंतर पाचव्या दिवशी गौरीचा मुक्काम ही गणेश भक्तांच्या घरी राहणार आहे. बाप्पाच्या आगमनाचे पूजन झाल्यानंतर अतिशय उत्साह पूर्ण वातावरणामध्ये बाप्पाचे मनोभावे दर्शन घेतले. बापाच्या आगमनाने रायगड जिल्ह्यात चैतन्यमय वातावरण निर्माण झालेले पाहावयास मिळाले.

दीड दिवसाच्या गणरायाचे विसर्जन केल्यानंतर आता सर्वांनाच वेध लागलेत ते गौराईच्या आगमनाचे. विशेषतः महिलांना गौराईच्या आगमनाची ओढ असते. रविवारी गौराईंचे आगमन होईल. दोन दिवस तिचे आगमन, कोडकौतुक आणि पुजनाचे असतात. गौराई पुजनाला ओवसा असे म्हटले जाते. यासाठी बांबुपासून बनवलेले सूप आणि सुपली यांचा वापर केला जातो. या वर्षी गौरीपूजन पूर्वा नक्षत्रात येत असल्याने



### गौरी पुजनासाठी सुपांना वाढती मागणी

नवविवाहितांचे ओवसे होणार आहेत. त्यामुळे मोठी सुपे आणि छोट्या सुपलीला अधिक मागणी आहे.

सुपे बनवणाऱ्या बुरुड समाजाला यातून चांगले उत्पन्न मिळते. बांबूपासून सुप, टोपली, दुरडी आदी वस्तु बुरुड समाजामार्फत वर्षभर बनवल्या जातात, मात्र गणपती कारखानदारांप्रमाणे बुरुड आळयांमध्ये सुपे बनवण्याची लगबग सुरु आहे. गौरी-गणपतीचा सण कोकणात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो व या काळात सुपांना मोठी मागणी असते. सध्या अशी सुपे बाजारात व दारोदारी विक्रीसाठी येत असून, त्यामुळे काहीशा अडगळीत गेलेल्या बुरुड समाजाच्या व्यवसायाला यानिमित्ताने सुगीचे दिवस आले आहेत. सध्या एक सुप २०० ते २५० रूपयांपर्यंत विकले जात आहे. अनेक महिला आजही बांबूचा व्यवसाय सामाजिक ओळख म्हणून करीत आहेत.

रविवारी गौरी आगमन झाल्यानंतर सोमवारी ओवसे होतील. सुवासिनींना गौरीचे ओवसे घेऊन जाण्यासाठी लागणारी बांबूपासून बनविलेली सुपे मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी अन्यत्र जात असतात. नवविवाहित वधूला पाच सुपे पुजावी लागत असल्याने विविध प्रकारची सुपे उपलब्ध आहेत. काही ठिकाणी पारंपरिक सुपे बनविण्यासाठी महिला युद्धपातळीवर काम करीत आहेत.

बुरुड व्यावसायिक बांबूपासून सुपे, टोपल्या, खुराडी, पाट्या बनविणे हे कलाकुसरीचे काम करत असतात. कारागिरांच्या कौशल्याची झलक यामध्ये पाहायला मिळते. पूर्वी या व्यवसायाला खूप मागणी होती, पण कालौघात हा व्यवसाय शेवटच्या घटका मोजतोय. सध्या बुरुड व्यावसायिकाची अवस्था हद्दपार झाल्यासारखी असून, सणासुदीच्या दिवसातच या व्यवसायाला काहीशी झळाळी येते. मुळात या व्यवसायात जेवढी मेहनत आहे त्या तुलनेत फायदा खूपच कमी आहे.

एक बांबू १०० ते १२० रुपयांना मिळतो व त्याच्या पात्या करण्याचे काम जोखमीचे असते. काम करत असताना पातीची किंवा कोयत्याची धार लागून हाताला जखमा होतात पण काम करावेच लागते. मेहनत जास्त आणि उत्पन्न कमी यामुळे नवीन पिढी या व्यवसायात उतरायला तयार नाही.

# साई पुरब गणेशोत्सव मंडळाने जपली सामजिक बांधिलकी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**प्रतिनिधी**

**कल्याण :** कल्याण पश्चिमेतील कोळीवली येथील साई पुरब हौसिंग सोसायटी मध्ये सालाबाद प्रमाणे यंदाही आयोजित करण्यात आला आहे. सोसायटीने केवळ गणपती स्थापना करणे हाच उद्देश न ठेवता लोकमान्य टिळकांना अभिप्रेत असलेला गणेशोत्सव साजरा करण्याचा प्रयत्न यंदाही केला आहे.

मंडळाने रक्तपुरवठयाचा तुटवडा लक्षात घेऊन ह्या कार्याला खारीचा वाटा उचलावा म्हणून लाईफ लाईन रक्तपेढी बापगांव यांच्या सहकार्याने साईपुरब सोसायटी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन केले.

नागरिकांनीही त्यास भरभरून प्रतिसाद दिला. विषेतः महिलांनी देखील मोठ्या प्रमाणात रक्तदान केले. लहान मुलांना मोबाईलच्या डिजिटल खेळा पासून दूर करण्यासाठी विविध मैदानी, वैयक्तिक तसेच सांघिक खेळाचे आयोजन केले आहे. तसेच त्यांच्या सुप्त कला गुणांना वाव मिळावा म्हणून नृत्य, गायन कार्यक्रमाचेही आयोजन केले होते. त्याला बच्चे कंपनीने भरभरून प्रतिसाद दिला. महिलांना स्वतःसाठी विरंगुळा मिळावा म्हणून संगीत खुर्ची या महिलांच्या आवडत्या खेळाचे आयोजन देखील करण्यात आले होते. असे अनेक सामाजिक, क्रीडा व सांस्कृतिक आणि संस्कार जतन करणाऱ्या विविध कार्यक्रमाचे आयोजन या मंडळाचे वतीने करण्यात आले होते.

त्याचप्रमाणे सामुदायिक स्नेहभोजनाचे देखील आयोजन केले ज्या मुळे सोसायटीतील प्रत्येक व्यक्ती आपापले क्षेत्रात मोठ मोठ्या हुद्द्यावर आहे, वेगवेगळया प्रांतातून आलेले आहेत परंतु येथे केवळ एक कुटुंब म्हणूनच आपला हुद्दा, आपले पद, मानपान बाजूला ठेऊन एकत्र आले होते. सद्ध्याच्या भाषावाद, प्रांतवाद आणि ब्लॉक संस्कृतीच्या विळख्यात सापडलेल्या परिस्थितीत साई पुरब गणेशोत्सव मंडळाने राबविलेले उपक्रम कौतुकास्पद आहेत.

# सांस्कृतिक पथकांच्या सादरीकरणाने उजळली पुष्पवती विद्यालयाची विसर्जन मिरवणूक



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ओतूर :** ग्रामविकास मंडळ ओतूर संचलित पुष्पवती विद्यालय डिंगोरे विद्यालयामध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेशोत्सव मोठ्या उत्साहात व पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. दहा दिवसांच्या धार्मिक व सांस्कृतिक वातावरणानंतर शनिवारी विद्यालयातील श्री गणरायाची विसर्जन मिरवणूक अतिशय दिमाखात व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली. या मिरवणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे विविध पारंपारिक व सांस्कृतिक पथकांचा समावेश. झेंडा पथक, टाळ पथक, पॉमपॉम पथक, आदिवासी नृत्य पथक, टिपरी पथक, लेझीम पथक, मंगळागौर पथक, घुंगुर काठी पथक अशा देखण्या पथकांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. रंगीबेरंगी वेशभूषा, तालबद्ध वादन, नृत्याविष्कार यामुळे विसर्जन मिरवणूक एक सांस्कृतिक सोहळा ठरली.

या पथकांचे उत्कृष्ट सादरीकरण पाहून ग्रामस्थांनी विद्यालयातील विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे मनःपूर्वक कौतुक केले. "विद्यार्थ्यांमध्ये संस्कृतिक गुणांची जपणूक व्हावी, पारंपरिक कला टिकून राहावी आणि गणेशोत्सव सुसंस्कृत वातावरणात साजरा व्हावा या उद्देशाने हा उपक्रम राबवला जातो," असे विद्यालयाचे मुख्याध्यापक शरद माळवे यांनी सांगितले.

मिरवणुकीतील पथकांची तयारी व सराव यासाठी शिक्षक अनुराधा नरवडे, दीपा सावंत, मंगेश कोंडार, दत्तात्रय घोलप, किसन भुतांबरे, दिनेश पाटील, रतिलाल बागुल, जगन्नाथ गाढवे, साधना तांबे, मंगेश डुंबरे व शिवाजी उकिरडे यांचे विशेष योगदान लाभले. त्यांचा परिश्रम आणि मार्गदर्शनामुळेच विद्यार्थ्यांनी इतक्या सुंदरपणे सादरीकरण केले, अशी भावना ग्रामस्थांतून व्यक्त झाली. गणेशोत्सव हा फक्त धार्मिक सोहळा न राहता तो सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक संस्कारांचा उत्सव व्हावा, या हेतूने शाळेमध्ये हा उत्सव पारंपारिक व शिस्तबद्ध पद्धतीने साजरा केला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासह कलागुणांना वाव मिळत आहे.

# आमदार किसन कथोरेंनी घेतले मुरबाड मधील गणपती बाप्पाचे दर्शन!



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड-प्रतिनिधी :** राज्यात सध्या गणेश उत्सवाची धुम सुरू असून मोठमोठे नेते मंडळी, सेलिब्रेटी गणरायाच्या चरणी लिन होताना दिसत आहेत.

मुरबाड विधासभेचे आमदार किसन कथोरे हे सुद्धा संपूर्ण मतदार संघातील घरगुती व सार्वजनिक गणेशोत्सवांना भेटी देऊन दर्शन घेत आहेत.आज त्यांनी मुरबाड शहरातील प्रसिद्ध मानाचा गणपती असलेल्या मुरबाडच्या राजाचे मनोभावे दर्शन घेतले.त्याच बरोबर शहरातील भाजपाचे माजी शहराध्यक्ष सुधिर तेलवणे, माजी नगराध्यक्ष किसन कथोरे, सागर कारले यांच्यासह अनेक घरगुती बाप्पाचे दर्शन घेऊन मनोभावे पुजा केली.यावेळी त्यांच्यासोबत सुधिर तेलवणे, माजी मोहन सासे, किसन अनंता कथोरे, नरेश जाखोटिया उपस्थित होते.

# केडीएमसीत नागरिकांना जलद सेवा

## सेवांची कालमर्यादा तीस दिवसांवरून सात ते पंधरा दिवसांवर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** महाराष्ट्र लोकसेवा हक्क सन 2015 च्या अध्यादेशानुसार शासनाकडील 68 आणि महापालिकेकडील 46 अशा एकूण 114 सेवा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने अधिसुचित केल्या आहेत. अधिसुचित करण्यात आलेल्या लोकसेवा जलद गतीने अर्जदारांना उपलब्ध करुन देता याव्यात या उद्देशाने शासनाने अधिसुचित केलेल्या या सेवापैकी 25 लोकसेवांची, शासन निर्णयाव्दारे विहीत करण्यात आलेली कालमर्यादा आता कमी करण्यात आली आहे.

यामध्ये (अ) दस्तऐवजाच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे.(ब) वारसा हक्काने मालमत्ता हस्तांतरण प्रमाणपत्र देणे, जलनि:सारण जोडणी देणे, अग्निशमन अंतिम नाहरकत दाखला देणे(महानगरपालिकेकरीता), पुन:कर आकारणी, रहिवास नसलेल्या मालमत्तांना करात सूट मिळणे, स्वंयमुल्यांकन, तात्पुरते/कायस्वरुपी नळजोडणी खंडीत करणे, पुन:जोडणी करणे, प्लंबर परवाना नुतनीकरण करणे, परवान्याचे नुतनीकरण, परवानां हस्तांतरण, परवाना रद्द करणे, कालबाहय परवानासाठी नुतनीकरण सुचना या सेवांची विहित कालमर्यादा 15 दिवसावरुन 12 दिवस करण्यात आली आहे.

नळजोडणी देणे, परवाना दुय्यमप्रत, फेरीवाले नोंदणी प्रमाणपत्र देणे या सेवांची विहित कालमर्यादा 15 दिवसावरुन 7 दिवस करण्यात आली आहे.

तर व्यवसाय परवाना स्वयं-नुतनीकरण या सेवेची विहित कालमर्यादा 15 दिवसावरुन 10 दिवस करण्यात आली आहे.

रस्ता खोदाई परवाना देणे, राज्य खादय परवान्याकरीता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा नाहरकत दाखला, खादय नोंदणी प्रमाणपत्राकरिता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा आरोग्य-विषयक ना हरकत दाखला या सेवांची विहित कालमर्यादा 30 दिवसावरुन 12 दिवस करण्यात आली आहे

महाराष्ट्र शुश्रृषा-गृह नोंदणी अधिनियम, 1949 अंतर्गत शुश्रृषागृह परवान्याचे नुतनीकरण करणे.(महानगर पालिकेकरीता), महाराष्ट्र शुश्रृषा-गृह नोंदणी अधिनियम,1949 अंतर्गत परवान्यावर परवानाधारक/भागिदाराचे नाव बदलणे.(महानगरपालिकेकरीता), लॉजिंग हाउस परवान्याचे नुतनीकरण करणे, मंगल कार्यालय/सभागृह वगैरे परवान्याचे नुतनीकरण करणे या सेवांची विहित कालमर्यादा 30 दिवसावरुन 15 दिवस करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे पाणी अनुपलब्धता प्रमाणपत्र देणे या सेवेची विहित कालमर्यादा 30 दिवसावरुन 07 दिवस करण्यात आली आहे.

वरील सेवांचा कालावधी शासनाने शासन निर्णयाव्दारे कमी केल्यामुळे नागरिकांना सदर सेवा जलद गतीने उपलब्ध होणे सुलभ होणार आहे.








**सोमवार**

**०१ सप्टेंबर २०२५**

**मेष**

विद्यार्थ्यांसाठी दिवस चांगला जाणार आहे. तुमचे कार्यालयीन काम पूर्ण करण्यात सक्षम असाल.

**वृषभ**

कायद्याचा अभ्यास करणाऱ्या या राशीच्या विद्यार्थ्यांसाठी दिवस खूप चांगला असेल.

**मिथुन**

नोकरदार महिलांना चांगला दिवस जाईल.नवीन व्यवसायात सहभागी होण्याची संधी मिळेल.

**कर्क**

दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. आज तुम्हाला उत्साही वाटेल. विद्यार्थ्यांसाठी दिवस आनंदाचा

**सिंह**

अविवाहित लोकांसाठी विवाहाचे प्रस्ताव येतील. कामाच्या दिशेने केलेली मेहनत फळ देईल.

**कन्या**

नवीन व्यवसायात सहभागी होण्याची संधी मिळेल. दिवस खूप छान असणार आहे.

**तूळ**

लोकांच्या आज तुमच्याकडून मोठ्या अपेक्षा असतील, तुम्ही त्यांच्या अपेक्षा पूर्ण कराल.

**वृश्चिक**

विद्यार्थी आज काही मोठी कामगिरी करतील. तुमचे काम वेळेवर पूर्ण करण्यात यशस्वी व्हाल.

**धनु**

दिवस तुमच्यासाठी संमिश्र जाणार आहे. आज तुम्हाला तुमच्या आरोग्याबाबत सावध राहा.

**मकर**

जंक फूड खाणे टाळावे. मित्रांसोबतचे संबंध चांगले राहतील. पूर्ण सहकार्य मिळेल.

**कुंभ**

दिवस तुमच्यासाठी अनुकूल असेल. आज ज्येष्ठांना धार्मिक कार्यात रस राहील. मंदिरात दान कराल.

**मीन**

आज मित्रांसोबत रेस्टॉरंटमध्ये जाल, तिथे आनंदाचे वातावरण असेल. खर्चावर नियंत्रण ठेवा.

### ०१ सप्टेंबर दिनविशेष

१९५६ : भारतीय आयुर्विमा महामंडळाची स्थापना.

२०२२ : भारतीय शिक्षणतज्ज्ञ आणि महिला हक्क कार्यकर्त्या मेरी रॉय यांचे निधन

२०२० : भारतीय क्रिकेटपटू शेखर गवळी यांचे निधन

१९७० : भारतीय-अमेरिकन अभिनेत्री लेखक पद्मा लक्ष्मी यांचा जन्म.

१९७९ : पायोनियर- ११ अंतराळयान शनीपासून २१,००० किमी अंतरावरुन गेले.

# विरार इमारत दुर्घटनेप्रकरणी चौघांना अटक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर :** पालघर जिल्ह्यातील विरार येथे झालेल्या इमारत दुर्घटनेप्रकरणी, ज्यात या आठवड्याच्या सुरुवातीला १७ जणांचा मृत्यू झाला होता. या दुर्घटनेला जबाबदार असलेल्या आणखी चौघांना अटक करण्यात आल्याची माहिती एका अधिकाऱ्याने शनिवारी दिली.

या दुर्घटनेच्या तपासाची जबाबदारी मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखेकडे सोपवण्यात आली आहे, असेही अधिकाऱ्याने सांगितले. बेकायदेशीरपणे उभारलेली चार मजली रमाबाई अपार्टमेंट इमारत बुधवारी मध्यरात्री सुमारे १२.०५ वाजता विरारच्या विजय नगर भागात शेजारील रिकाम्या घरावर कोसळली. या घटनेत किमान १७जणांचा, त्यात दोन लहान मुलांचाही समावेश होता, मृत्यू झाला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक शाहूराज रणवरे यांनी सांगितले की, गुन्हे शाखेने त्या जागेच्या दोन महिला मालकांना आणि त्यांचे पती जे रहिवाशांकडून भाडे गोळा करत होते, त्यांना अटक केली आहे.

यापूर्वी पोलिसांनी या प्रकरणातील मुख्य आरोपी, बांधकाम व्यावसायिक नीतल साने याला अटक केली होती.

या प्रकारे या प्रकरणात आतापर्यंत पाच जणांना अटक करण्यात आली आहे. महाराष्ट्राचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, दुर्घटनेत बाधित इमारतीतील रहिवाशांना तात्पुरते निवासस्थान म्हाडामार्फत उपलब्ध करून दिले जाईल.

# नैसर्गिक तलावात मूर्ती विसर्जन स्थानिकांवर गुन्हे दाखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :** भाईंदरच्या राई येथील गावकऱ्यांनी महापालिकेच्या नियमांचे उल्लंघन करून नैसर्गिक तलावात दीड दिवसांच्या गणेशमूर्तीचे विसर्जन केल्याप्रकरणी भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यंदा गणेशोत्सवात सहा फूटाखालील गणेशमूर्तीचे विसर्जन सक्तीने कृत्रिम तलावात करण्याचा निर्णय मिरा-भाईंदर महानगरपालिकेने घेतला होता. त्यासाठी शहरातील विविध ठिकाणी तब्बल ३५ कृत्रिम तलाव उभारण्यात आले.

त्यानुसार गुरुवारी दीड दिवसांच्या मूर्तीचे विसर्जन या तलावांमध्ये पार पडले. मात्र, भाईंदरमधील जुने राई, मोर्वा व मुर्धा गावातील नागरिकांनी कृत्रिम तलावात विसर्जन करण्यास नकार दिला. या प्रकरणी २५ ते ३० गावकऱ्यांवर भारतीय न्याय संहितेच्या कलम १३२,१९०,१९१(२), १९२,१९५(१),३२४(३), २२३ आणि ११५ (२) सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४,३ पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ कलम १५ (१) प्रमाणे गुन्हा दाखल झाल्याची माहिती भाईंदर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कांबळे यांनी दिली आहे.


Ambernath Municipal Council (AMC), Ambernath

E-Tender notice no. Electrical_05/2025-26

Outword No. AMC/Electrical dept/2025-26/198 Dated: 28/08/2025

Online tenders (E-tender) in B-1 form for the following work are invited by The chief Officer, Ambernath Municipal Council (AMC), Ambernath on Maharashtra electronic tender management system www.mahatenders.gov.in from Contractors Registered by Public Works Department or 'Maharashtra Jeevan Pradhikaran' with adequate experience of Similar Works Fulfilling the terms and conditions of the tender documents with experience of similar type of works. The name of work, estimated cost, earnest money deposit, security deposit, time limit for completion of work, general terms and conditions etc. are as under -

NAME OF WORK : - PROVIDING AND ERECTING STREETLIGHT FROM PURANDARE UDYAN TO UPSC BHAVAN ROAD AND BHAWANI MANDIR ROAD IN WARD NO.44, AMBARNATH EAST.

| | |
|---|---|
| Estimated cost put to tender: | Rs. 12,700,91/- (Excluding GST) |
| Tender fee amount | Rs. 590/- |
| EMD | Rs. 12,700/- |
| Period of completion of work | 6 Months |
| Date and time of commencement of downloading bid documents | Date 30/08/2025 time:12:00 pm |
| Last date and time for downloading the bid documents | Date 08/09/2025 time:12:00 pm |
| Last date and time for submission of bids | Date 09/09/2025 time:12:00 pm |
| Submission of Hard Copy of documents | Date 10/09/2025 upto 18:00 pm |
| Date and time for opening of bid | Date 10/09/2025 time: 15:00 pm onwards or as per administrative convenience |
| Shortlisting of Successful Bidder(s) and issue of LOIs/ LOAs | To be intimated through portal/letter |

Terms and conditions

1. All eligible contractors are mandated to get enrolled on e - tendering portal www.mahatenders.gov.in.
2. Right to reject any or all tenders without assigning any reasons are reserved by The chief Officer,, Ambernath Municipal Council (AMC), Ambernath

Sd/-
Chief Officer,
Ambernath Municipal Council,
Ambernath

*जवक क्रमांक
अंनप/विद्युत विभाग/2025-26/198
दि. 28/08/2025


# मुंब्रा खाडीकिनारी बेवारस मतदार ओळखपत्रे

## ठाणे काँग्रेस मुख्य प्रवक्ते राहुल पिंगळे यांची उच्चस्तरीय चौकशीची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुंब्रा खाडीकिनारी साफसफाई सुरू असताना कर्मचाऱ्यांना एका पिशवीत मतदार ओळखपत्रे व पॅनकार्ड सापडल्याने खळबळ उडाली आहे. ही माहिती मिळताच काँग्रेसचे ब्लॉक अध्यक्ष निलेश पाटील यांनी गणेशघाट परिसरात धाव घेतली. त्यांनी कागदपत्रांचे फोटो-व्हिडीओ काढले आणि काही मतदान ओळखपत्रांवरील पत्त्यांची चौकशी केली असता, तेथे कोणीही वास्तव्यास नसल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे ही ओळखपत्रे बोगस



असल्याचे उघड झाले.

ठाणे काँग्रेसच्या शिष्टमंडळाने ही कार्डे १४९ विधानसभा मतदारसंघाचे मतदार नोंदणी अधिकारी संदीप थोरात यांच्याकडे सुपूर्द केली. यावेळी ठाणे काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते राहुल पिंगळे यांनी प्रखर संताप व्यक्त करत निवडणूक आयोगावर सडकून टीका केली.

खा. राहुल गांधी गेली अनेक वर्षे वोट चोरीसाठी बोगस मतदार नोंदणी होत असल्याचे पुराव्यासकट सांगत आहेत. मात्र निवडणूक आयोग सतत डोळेझाक करून सरकारला पाठीशी घालत आहे. ठाण्यात घडलेली ही घटना त्याचे ठोस पुरावे देणारी आहे, असे पिंगळे म्हणाले. ते पुढे म्हणाले, ही बोगस ओळखपत्रे नेमकी कशी तयार झाली? त्यासाठी कोणते आधारकार्ड, रहिवाशी दाखले व मोबाईल क्रमांक सादर करण्यात आले? नोंदणी कोणत्या सायबर कॅफे किंवा आधारसेतूमार्फत झाली? याचा उपयोग कोणत्या निवडणुकांमध्ये झाला? या सर्व बाबींचा सखोल तपास झाला पाहिजे. हा प्रकार म्हणजे लोकशाहीवर थेट आघात असून, दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे. अन्यथा लोकशाही केवळ नावापुरती राहील. या शिष्टमंडळात निलेश पाटील, मोतीराम भगत, वसीम सय्यद, यासीन मोमिन, रवींद्र कोळी, नूर्शिद शेख, हमीद शेख, रमेश सोनवणे, रोशन पाटील आदी पदाधिकारी उपस्थित होते. काँग्रेसने या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांनाही जबाबदार धरण्याची मागणी केली आहे.

**मंदारमाला अभय नगर झोपडपटी, कळवा या पत्त्यावर परब नावाचे गृहस्थ मागील २० वर्षापासून राहत आहेत. मात्र सापडलेल्या कार्डावरील पत्ता हाच असल्याचे दिसते. त्यामुळे सर्व कार्डाच सत्य व्हेरिफिकेशन होणे अत्यावश्यक आहे. जमा करण्यात आलेली बहुतेक ओळखपत्रे २०१५ सालातील असून, काही २०१४, २०१६ व २०१७ सालातील आहेत. हा घोटाळा केवळ मतदार नोंदणीपुरता मर्यादित नसून, लोकशाही व्यवस्था धोक्यात आणणारा कट आहे. - राहुल पिंगळे (प्रवक्ते काँग्रेस ठाणे)**

# लाचखोरी प्रकरणी वनपाल आणि वनरक्षक जेरबंद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** मोरपीस विक्री करताना पकडल्यावर गुन्हा दाखल न करण्यासाठी आणि जप्त केलेली मोरपीस परत करण्यासाठी ५० हजारांच्या लाचेची मागणी करत, तडजोडीअंती ठरलेले २५ हजारांची लाच घेतल्याप्रकरणी ठाणे वनविभागाचे वनपाल नीलेश सीताराम श्रावणे (४७) आणि वनरक्षक मच्छिंद्र प्रकाश सोनटक्के (२५) या दोघांना ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) अटक केली. ही कारवाई गुरुवारी करण्यात आली असून याप्रकरणी वर्तकनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्या दोघांना न्यायालयाने दोन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आले दिले आहेत.

२५ वर्षीय तक्रारदार यांच्या भाऊ आणि ओळखीच्या लोकांना मोरपिस विक्री करताना, ठाणे वनपाल श्रावणे यांनी कारवाई करत ताब्यात घेतले होते. त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल न करण्याकरिता व जप्त केलेली मोरपीस परत करण्याकरिता श्रावणे यांनी ५० हजार रुपयांच्या लाचेच्या रकमेची मागणी केली होती. याचदरम्यान तक्रारदारांनी ठाणे एसीबी कार्यालयात धाव घेत, तक्रार दिली होती.

त्या अनुषंगाने २६ ऑगस्ट रोजी केलेल्या पडताळणी श्रावणे यांनी तक्रारदार यांचेकडे तडजोडीअंती २५ हजार रुपयांच्या लाचेच्या रकमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. गुरुवारी श्रावणे यांच्या सांगण्यावरून वनरक्षक सोनटक्के याने २५ हजार रुपये तक्रारदार यांच्याकडून स्वीकारताना रंगेहात पकडल्यानंतर वनपाल श्रावणे आणि वनरक्षक सोनटक्के या दोघांना लाचप्रकरणी अटक केली. याप्रकरणी श्रावणे व सोनटक्के यांच्याविरुद्ध वर्तकनगर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला असून पुढील तपास ठाणे एसीबीचे पोलीस निरीक्षक सचिन मोरे हे करत आहेत.

# सिडकोची नोकरभरती वादाच्या भोवऱ्यात ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

भ्रष्टाचाराचे कुरण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सिडकोमध्ये नव्याने होत असलेली नोकर भरती संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. कार्यकारी अभियंता, सहाय्यक कार्यकारी अभियंता, सहाय्यक परिवहन अभियंता, वरिष्ठ नियोजनकार, अर्थशास्त्रज्ञ आणि विधी अधिकारी या पदांच्या भरतीसाठी झालेल्या लेखी आणि तोंडी परीक्षेची गुणवत्ता यादी जाहीर न करताच प्रशासनाने ठरावीक उमेदवारांना कागदपत्रांच्या पडताळणीसाठी बोलवले आहे. त्यामुळे या भरतीबाबत मोठ्याप्रमाणात गैरव्यवहार झाल्याचा आरोप सिडको ओबीसी कर्मचारी वेल्फेअर असोसिएशनने केला आहे.


सिडकोची स्थापना झाल्यापासून सिडकोमध्ये अनेक वेळा नोकरभरती झाली आहे. प्रत्येक नोकर भरतीच्या वेळी सिडकोकडून घेतल्या जाणाऱ्या लेखी आणि तोंडी परीक्षेची गुणवत्ता यादी जाहीर केली जात होती. या यादीत सर्वच उमेदवारांचा मेरिट लिस्टनुसार समावेश असायचा. मात्र सिडकोने नुकतीच कार्यकारी अभियंता, सहाय्यक कार्यकारी अभियंता, सहाय्यक परिवहन




अभियंता, वरिष्ठ नियोजनकार, अर्थशास्त्रज्ञ आणि विधी अधिकारी या पदांची भरती करण्यासाठी लेखी आणि तोंडी परीक्षा घेतली. हजारो उमेदवारांनी ही परीक्षा दिली. या परीक्षेमध्ये आपल्याला किती गुण मिळालेले, निवड झालेल्या उमेदारांना आपल्यापेक्षा किती गुण जास्त आहेत, याचा कोणाला काहीच थांगपत्ता नाही. या परीक्षेची मेरिट लिस्ट जाहीर न करताच सिडको प्रशासनाने ठरावीक उमेदवारांना कागदपत्रांच्या पडताळणीसाठी बोलावले आहे. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर परीक्षार्थीनी संताप व्यक्त केला आहे.

सिडकोमध्ये यापूर्वी नोकर भरतीसाठी झालेल्या परीक्षांचा संपूर्ण निकाल जाहीर केला जात होता. परीक्षेला बसलेल्या सर्वच उमेदवारांना आपल्याला किती गुण मिळालेत हे कळत होते. मात्र आता सिडको प्रशासनाने या पद्धतीला बगल दिली आहे. त्यामुळे परीक्षार्थीमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे नोकर भरतीसाठी नुकत्याच झालेल्या लेखी आणि तोंडी परीक्षेत सर्वच उमेदवारांना किती गुण मिळाले आहेत, याची यादी सिडकोच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी, अशी मागणी अध्यक्ष रमेश मोकल यांनी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्याकडे केली आहे.

# नाट्यगृहाच्या पार्किंग परिसरात किचनची शेड ?



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

शहरातील अध्यक्रांतीवर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह हे सांस्कृतिक कार्यक्रमांचे प्रमुख केंद्र मानले जाते. या नाट्य गृहात दररोज चार ते पाच नाटकाचे तसेच अन्य सांस्कृतिक प्रयोग पार पडतात, त्या सोबत या नाट्य गृहाच्या इमारतीची मध्ये, उपहार गृह देखील सुरू केले आहे,. या उपहार गृहात खाद्य पदार्थ विकण्याची परवानगी संबंधित ठेकेदार मैत्री कॅटरर्स यांना देण्यात आली आहे, त्या सोबत हे पदार्थ गरम करण्याची जबाबदारी त्या उपहार गृह च्या ठेकेदाराला दिली आहे, मात्र अन्न पदार्थ गरम करण्याची स्वतःच्या मालकीची जागा ठेकेदाराकडे नसल्याने, ठेकेदाराने नाट्यगृहाच्या पार्किंग परिसरात एका कोपऱ्यात पत्र्याचे भले मोठे शेड उभा केले आहे.

विशेष म्हणजे या शेड उभा केल्याची माहिती पालिकेच्या कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्याला नाही, या किचन शेड मध्ये काय चालते, याची माहिती देखील पालिकेकडे नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे, विशेष म्हणजे हा ठेकेदार गेल्या काही वर्षा पासून विविध कारणामुळे वादग्रस्त राहिला आहे,

नुकतेच पावसाळयात स्थलांतरित करण्यात आलेल्या रहिवाशांना देण्यात आलेल्या नाश्ता मध्ये आळया आढळल्याचा प्रकार याच ठेकेदाराने पुरविलेल्या खाद्यपदार्थात घडला होता, त्या नंतर पालिकेने ठेकेदाराला केवळ नोटीस बजावून कारवाई केल्याचा बनाव केला मात्र ठोस कारवाई केली नाही, त्या मुळे ठेकेदार पालिकेच्या मर्जीतला असल्याचा आरोप केला जात आहे. याच ठेकेदाराने पालिकेच्या मालकीचे आलेल्या नाट्यगृहाच्या पार्किंगमध्ये किचन शेड उभा करून पुन्हा वाद उभा केला आहे.

> **नाट्य गृहाच्या आवरत अशा प्रकारचे शेड उभारले आहे, त्या बाबत अधिकृत माहिती घेऊन शेड ची चौकशी केली जाईल आणि परवानगी घेतली नसेल तर योग्य ती कारवाई देखील केली जाईल**
>
> ● डॉ वैभव विधाते,

> **नाट्यगृहातील कॅन्टीन चा ठेका दिलेल्या ठेकेदाराला केवळ, कॉन्टिंग मधील पदार्थ गरम करण्यासाठी किचन आवश्यक आहे, मात्र त्या पार्किंग मध्ये उभा केले असेल तर चौकशी केली जाईल तसेच किचन शेड छोटे असणे गरजेचे आहे. त्याने मोठे शेड मोठे उभा केले असेल तर माहिती घेऊन कारवाई केली जाईल**
>
> ● राजेश डोंगरे, नाट्यगृह व्यवस्थापक

# जीवनदीप महाविद्यालयातील प्राध्यापकांचे सेट परीक्षेत यश





दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**गोवेली :** राज्य पातळीवर प्राध्यापकांसाठी घेण्यात येणारी; राज्य पात्रता परीक्षा अर्थात सेट परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. यामध्ये जीवनदीप महाविद्यालयात कार्यरत असणारे गणित विभागातीलप्रा. अविनाश गायकर व व्यवस्थापन शास्त्र विभागातील प्रा .अशोक ईर या दोन प्राध्यापकांनी सेट परीक्षेत यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे, प्राचार्य डॉ.अशोक वाघ, उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे संचालक प्रशांत घोडविंदे यांनी कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



## गुणसागरचा मोरया

कळवा येथील गुणसागर नगर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची पर्यावरणपूरक शाडूची मनमोहक मूर्ती
मुर्तिकार - श्री समीर चंद्रकांत राबांडे
रंगीत माती आर्ट स्टुडिओ

# पिस्तूलासह दोन जिवंत काडतूस बाळगणाऱ्यास भिवंडी गुन्हे शाखेने केली अटक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** प्रतिनिधी भिवंडी शहरात सार्वजनिक गणेशोत्सवाची धामधूम सुरू झाली आहे त्यामुळे पोलीस यंत्रणा सुध्दा सतर्क झाली असुन उत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाकडून ठिकठिकाणी चोख बंदोबस्त व गस्त घातली जात आहे.या दरम्यान भिवंडी गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जनार्दन सोनावणे यांच्या विशेष पोलीस पथकाने केलेला कारवाईत एका सराईत गुन्हेगारास एक पिस्टल व दोन जिवंत काडतूसां सह ताब्यात घेत अटक केली आहे.या प्रकरणी शांतीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नफिस उर्फ तोतला ( रा.शांतीनगर )असे अटक आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार भिवंडी गुन्हे शाखेचे पोलीस शिपाई इंगळे यांना माहिती

मिळाली कि सराईत गुन्हेगार नफीस उर्फ तोतला हा पाईपलाईन रोड या परिसरात गुन्हा करण्याचे इराद्याने आपल्या ताब्यात अग्निशास्त्र घेऊन फिरत आहे.त्यामुळे भिवंडी गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जनार्दन सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मिथुन भोईर,पोलीस उप निरीक्षक रवींद्र पाटील,सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सुधाकर चौधरी,पोलीस कर्मचारी बोरसे,राणे,पाटील,घाग,डोंगरे,इंगळे,घरत व कुंभार यांनी शनिवारी रात्रीच्या सुमारास शांतीनगर परिसरातील कल्याण रोड पाईप लाईन रोड परिसरात सापळा रचून संशयित नफीस यास ताब्यात घेतले.त्याच्या अंग झडती मध्ये त्याच्याजवळ एक पिस्टल व दोन जिवंत काडतूस आढळून आल्याने त्यास ताब्यात घेत त्याविरोधात शांतीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून या गुन्ह्याचा अधिक तपास भिवंडी गुन्हे शाखेचे पोलीस करीत आहे.




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे ■ सोमवार ■ ०१ सप्टेंबर २०२५

४

jeevandeepvartanews2020@gmail.com

# सहाव्या मजल्यावरून लिफ्ट कोसळून चार जण गंभीर जखमी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पश्चिम गांधारी परिसरातील रॉयस गॅलेक्सी इमारतीची लिफ्ट सहाव्या मजल्यावरून कोसळून मोठा अपघात झाल्याची घटना शनिवारी रात्री घडली या घटनेत चार जण गंभीर जखमी झाले. तर सुदैवाने जिवितहानी टळली.

कल्याण पश्चिमेतील गंधारी परिसरातील रॉयस गॅलेक्सी इमारतीत पाचव्या मजल्यावर राहणार्या अंकित मेस्त्री यांच्या घरी गणपती दर्शनासाठी त्यांचे मित्र आले होते. गणपती दर्शन नंतर आठव्या मजल्यावर जेवणाची व्यवस्था असल्याने लिफ्ट मधून जात असताना सहाव्या मजल्यावरून लिफ्ट थेट खाली कोसळली आणि मोठा आवाज झाला. यावेळी लिफ्ट मध्ये आठजण होते. आवाजामुळे इमारती मधील इतर जणांनी धाव घेतली, आणि मदतीला धावले. या घटनेत चार जण गंभीर जखमी झाले. दोन जणांचे पाय फँक्चर झाले असून खाजगी रूग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू असून यामध्ये सुदैवाने जिवितहानी टळली. तर सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार इमारतीला दोन लिफ्ट आहेत मग नादुरुस्त लिफ्ट चालू ठेवून रहिवाशांच्या जीवाशी खेळ का केला असा प्रश्न उपस्थित होत आहे. इमारती मधील लिफ्टची नियमावलीचे काटेकोर पालन होणे वेळीच देखभाल दुरुस्ती बाबत रहिवाशांनी सज्जग राहणे देखील महत्त्वाचे असल्याचे दिसत आहे. या घटनेने इमारती मधील लिफ्ट देखभाल दुरूस्तीसह लिफ्ट मधून किती वजन वाहून नेले जाते त्याक्षमेतेच्या उल्लघंन केले जाते की,नाही असे प्रश्न ऐरणीवर आले असल्याचे चित्र दिसत आहे.



## पीओपी मूर्तींचे विसर्जन करण्यासाठी मुरबाड नगरपंचायतीच्या वतीने कृत्रिम अमृतजलाची व्यवस्था

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**मुरबाड :: दिलीप पवार**

मुरबाड शहरा मध्ये प्रथमच पीओपी मूर्तीचे विसर्जन करण्यासाठी कृत्रिम तलावात अमृतजलाची सोय करण्यात आली आहे रोटरी क्लब ऑफ कल्याण रिव्हर साईड या संस्थेने या कृत्रिम तलावाची प्लास्टिक ताडपत्री मुरबाड नगरपंचायतीला भेट म्हणून दिली आहे. या तंत्रज्ञानाचा उद्देश गणेशोत्सवामध्ये पीओपी मुळे होणारे पाण्याचे प्रदूषण कमी करणे हा आहे जिप्सम सल्फेट पीओपी ( pop ) च्या गणेश मूर्ती अमोनियम बायोकार्बोनेटच्या द्रावणात विरघळवून टाकण्याचे पर्यावरण पूरक तंत्र पुण्यातील राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा यांचे तर्फे विकसित करण्यात आले आहे त्यामुळे पीओपी चे अमोनियम सल्फेट व कॅल्शियम कार्बोनेट मध्ये रूपांतर होते याचा द्रव व घन या दोन्ही स्वरूपात खत म्हणून वापरण्यास उपयोग होतोया कृत्रिम तलावामध्ये विसर्जन केलेल्या पीओपी मूर्तीचे तीन ते चार दिवसात विघटन होते प्लास्टिक ताडपत्रीच्या तळाशी कॅल्शियम कार्बोनेट उरते याचा उपयोग मातीतील कॅल्शियम कार्बोनेटची पूर्तता करण्यासाठी किंवा खड्डू तयार करण्यासाठी करता येतो , द्रवरूप पदार्थ म्हणून अमोनियम सल्फेट उरते त्याचा उपयोग खतासाठी करता येत असल्याचे मुरबाड नगरपंचायतीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

> "
>
> **पाण्याचे व पर्यावरणाचे संरक्षण करने व प्रदूषण रोखने ही काळाची गरज आहे.रोटरी क्लब व मुरबाड नगरपंचायतीच्या माध्यमातून कृत्रिम तलावांची निर्मिती केली आहे. नागरिकांनी बाप्पा विसर्जनासाठी प्लास्टिक टाक्यांचा वापर करावा**
>
> **- मनोज म्हसे,**
>
> **मुख्याधिकारी नगरपंचायत मुरबाड**

## आगरी सेना पत्रकार संघाच्या तालुका प्रमुखपदी जेष्ठ पत्रकार मिलिंद खारपाटील

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●



**पेण :** आवाज महामुंबईचा चॅनेल चे संपादक तथा पत्रकार उत्कर्ष समिती रायगड जिल्हाध्यक्ष मिलिंद खारपाटील यांची आगरी सेना पत्रकार संघ उरण तालुकाप्रमुख पदी नियुक्ती जिल्हा प्रमुख सचिन मते यांनी जाहीर केली. मिलिंद खारपाटील हे गेली ३६ वर्ष अनेक वर्तमानपत्र आणि न्यूज चॅनेल मध्ये सक्रिय काम करीत आहेत.श्रमजीवी मध्ये सहसंपादक, श्रमशक्ती मध्ये कार्यकारी संपादक, महामुंबई २४ बाय ७ मध्ये संपादक म्हणून त्यांनी काम केले आहे. रामप्रहर, कर्नाळा, किल्ले रायगड, आपले साम्राज्य, आवाज कोकणचा, पुण्यनगरी, कृषीवल, उरण टाईम्स आदी वृत्तपत्रांमध्ये त्यांनी काम केले आहे.सध्या ते आवाज महामुंबईचा चॅनेल मध्ये संपादक असून पत्रकार उत्कर्ष समिती रायगड चे ते जिल्हाध्यक्ष आहेत. जेथे अन्याय होत असेल तेथे लेखणीने पहिला वार करतात.कोकणातील पर्यटन स्थळांची त्यांनी वृत्तपत्र आणि चॅनेल मधून माहिती दिल्याने कोकणातील पर्यटक वाढले.स्थानिकांना रोजगार मिळाला.त्यांनी आतापर्यंत २६ वेळा रक्तदान केले आहे. वीस हजार वृक्षारोपण मध्ये सक्रीय सहभाग घेतला आहे.अनेक वृत्तपत्रांकडून आणि चॅनेल कडून त्यांच्या पत्रकारितेची दखल घेऊन सन्मानित करण्यात आले आहे. भारत सरकारचा जनशिक्षण सन्मान, द्रोणागिरी भूषण, पनवेलभूषण, कोकण रत्न आदी पुरस्कारांनी सन्मानित केले आहे. ते अनेक सामाजिक संस्था येथे कार्यरत आहेत. त्यांनी आतापर्यंत १४३ किल्ले पाहिले असन त्यांनी आजपर्यंत अनेक गरजू व गरीब विद्यार्थ्यांना मोलाची मदत केली आहे .त्यांच्या निवडीचे संपूर्ण रायगड जिल्ह्यात स्वागत करण्यात येत असून अनेकांनी अभिनंदन केले आहे.

## ठाणे महानगरपालिका मुख्यालयत स्थानिक स्वराज्य दिन साजरा

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

ठाणे महानगरपालिका मुख्यालयाच्या प्रांगणात, रविवार, ३१ ऑगस्ट हा 'स्थानिक स्वराज्य दिन' साजरा करण्यात आला. या निमित्ताने, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांच्या हस्ते महापालिका ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) उमेश बिरारी, मुख्य अग्निशमन अधिकारी गिरीश झळके, महिला व बालविकास अधिकारी दयानंद गुंडप, माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर आणि अग्निशमन दलाचे जवान, सुरक्षा मंडळाचे जवान तसेच महापालिका कर्मचारी उपस्थित होते.

## वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या भिवंडी महापालिकेतील ७४ कर्मचाऱ्यांच्या बदल्या

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर यांनी दि. २९.०८.२०२५ रोजीच्या आदेशान्वये सन २०१७ पुर्वीपासुन एकाच विभागात कार्यरत असणाऱ्या ७४ कर्मचाऱ्यांच्या महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील कलम ४ नुसार अन्य विभागात बदल्या केल्या आहेत. दि. २९.०८.२०२५ रोजी सायंकाळी या बदल्यांचे आदेश निर्गमीत करण्यात आले. या आदेशानुसार बदल्या करण्यात आलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना तातडीने नविन विभागात रुजू होण्याचे आदेश आयुक्तांनी दिले आहे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेत लिपीक पदावर कार्यरत अनेक कर्मचारी हे वर्षानुवर्ष एकाच विभागात कार्यरत होते. अनेक नागरीक, पदाधिकारी, समाजसेवक यांच्या याबाबत तक्रारी आयुक्तांकडे प्राप्त होत होत्या. विभागप्रमुखांच्या विहीत कालावधीमध्ये बदल्या होत असतात, मात्र त्या विभागातील लिपीक वर्षानुवर्ष एकाच टेबलवर किंवा विभागात काम करीत असल्याने त्यांच्या कामामध्ये एक साचेबद्धपणा आला होता. कोणतीही नविन कल्पना राबविली जात नव्हती. तसेच, प्रत्येक कर्मचाऱ्याने त्यांच्या सेवा कालावधीमध्ये विविध विभागांचे काम शिकणे आवश्यक आहे. त्यानुसार २०१७ पुर्वीपासुन एकाच विभागात कार्यरत कर्मचाऱ्यांच्या अन्य विभागात बदल्या करण्यात आल्या आहेत.

जर बदली झालेले कर्मचारी नविन ठिकाणी रुजू झाले नाहीत, आणि त्यांनी बदली रद्द करणे किंवा सुधारीत करणेकरिता राजकीय, अराजकीय दबाव आणल्यास त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशारा आयुक्तांनी दिला.



## महिलेचे धडावेगळे शीर आढळल्याने भिवंडीत खळबळ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी (प्रतिनिधी)**

गणेशोत्सवाची धामधूम सुरू असतानाच भिवंडी शहरातील ईदगाह परिसरात सीमेवरून वाहणाऱ्या कामवारी खाडी किनारी दलदली मध्ये शनिवारी एक २५ ते २८ वर्ष वयाच्या अज्ञात महिलेचे धडावेगळे शिर आढळून आल्याने परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे.

या घटनेची माहिती मिळताच भोईवाडा पोलिस ठाण्यातील वरिष्ठ पोलिस निरीक्षक अशोक रत्नपारखी हे पोलिस पथकासह घटनास्थळी दाखल होत.त्यांनी शिर ताब्यात घेत शासकीय रुग्णालयात उत्तरीय तपासणी साठी पाठवून दिले आहे.याबाबत भोईवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

सदर हत्या झालेल्या महिलेची ओळख पटवून हे शिर याठिकाणी नक्की कोठून वाहून आले आहे का ? या महिलेची हत्या कोणी केली ? याचा शोध घेण्याचे मोठे आव्हान पोलिसां समोर आहे.शिर मिळाल्याची वार्ता पसरल्याने परिसरात खळबळ उडाली होती.तर घटनास्थळी बघ्यांची मोठी गर्दी जमा झाली होती.



## भिवंडीतील नेत्रचिकित्सा शिबिरास गणेशभक्तांचा भरघोस प्रतिसाद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :: शरद भसाळे**

एकात्मतेचा राजा म्हणून गौरविल्या जाणाऱ्या भिवंडीतील धामणकर नाका गणेशोत्सव मित्र मंडळ व "श्री भैरव नेत्र चिकित्सा " रुग्णालय यांच्या सयुक्तिक विद्यमाने नेत्रचिकित्सा शिबिर गणेश मंडपात आयोजित करण्यात आले होते.यावेळी शेकडो गणेशभक्तांनी नेत्र तपासणी चिकित्साचा लाभ घेतला.

उत्सव मंडळाचे अध्यक्ष संतोष शेट्टी यांच्या पुढाकाराने आयोजित नेत्र चिकित्सा शिबिर उद्घाटनसहाय्यक पोलिस आयुक्त सचिन सांगळे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रसंगी भैरव सेवा समितीचे अनिल जैन,दिलीप पोद्दार,हसमुख पटेल,संजय भोईर,मोहन बल्लेवार, समितीचे प्रमुख मुरारी पोद्दार, राकेश पटवारी उपस्थितीत होते.

गणेशोत्सव मंडळानी धार्मिक कार्यक्रम करत असताना सामाजिक उपक्रम करून सुध्दा राबविणे आवश्यक आहे.धामणकर नाका गणेशोत्सव मंडळ नेत्र चिकित्सा शिबीर,रक्तदान शिबीर व गरजूंना मदत कार्य करीत आहे हे प्रशसंनिय उपक्रम आहे इतर मंडळांनी सुध्दा त्यांचे अनुकरण करून स्तुत्य उपक्रम राबविण्यात यावे असे आवाहन भिवंडी चे सहाय्यक पोलिस आयुक्त सचिन सांगळे यांनी केले.या शिबिरात ३३५ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली ज्यामध्ये २१५ रुग्णांना मोफत चष्मे वितरीत करण्यात आले.तसेच नेत्र तपासणीत आढळून आलेल्या २५ रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया धामणकर नाका मित्र मंडळाच्या वतीने करण्यात येणार असल्याची माहिती संतोष शेट्टी यांनी दिली.हे शिबिर यशस्वी करण्यासाठी मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्तेनी विशेष मेहनत घेतली.

## मुंबईकडे जाणाऱ्या अवजड वाहनांना नवी मुंबईतही प्रवेश बंदी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल -** मनोज जरांगे पाटील यांनी मुंबई येथे पुकारलेल्या आंदोलनामुळे मुंबईकडे जाणारे सगळेच महामार्ग वाहनांनी तुडूंब झाल्याने अजून अतिरीक्त वाहनांचा बोजा मुंबईवर पडू नये यासाठी मुंबई पोलिसांनी अवजड वाहनांचे प्रवेश बंदी केल्यानंतर नवी मुंबई पोलिसांनी स्वता पुढाकार घेऊन मुंबईच्या दिशेकडे जाणा-या अवजड वाहनांना (१० चाकी) नवी मुंबईतच प्रवेश बंदीचे आदेश दाखवून थांबवले जात आहे. नवी मुंबई वाहतूक पोलीस उपायुक्तांनी यासंदर्भात शुक्रवारी स्वतंत्र अधिसूचना जाहीर करून तातडीने त्याची अंमलबजावणी सुरू केली. यामुळे ठाणे आणि पनवेलच्या अनेक ठिकाणाहून मुंबईत प्रवेश करणा-या महामार्गांवर मोठ्या प्रमाणात अवजड वाहनांना रोखण्यात येत आहे. नवी मुंबई पोलिसांनी स्वता पुढाकार घेऊन मुंबईच्या दिशेकडे जाणा-या अवजड वाहनांना थांबवले जात आहे.

## वसईत कृत्रिम तलावांना उत्तम प्रतिसाद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसईः** गणेशमूर्ती विसर्जनासाठी महापालिकेने तयार केलेल्या कृत्रिम तलावांना नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला. मागील वर्षीच्या तुलनेत मूर्तीचे कृत्रिम तलावात विसर्जनाचे प्रमाण हे वाढल्याचे दिसून आले. यावर्षी दीड दिवसांच्या एकूण १३ हजार ६८२ गणेशमूर्ती विसर्जनापैकी ११ हजार ४४८ गणेशमूर्तीचे विसर्जन हे पालिकेच्या कृत्रिम तलावात करण्यात आले. म्हणजेच एकूण ८३ टक्के विसर्जन हे कृत्रिम तलावात झाले. यंदाच्या वर्षीही पालिकेने पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करण्यावर भर दिला आहे.

## गणेशोत्सवात रोजगार मेळावा ठाकरे गटाच्यावतीने आगळा- वेगळा महोत्सव

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण-** सध्या सगळीकडे गणेशोत्सव ची धूम आहे आणि प्रत्येक मंडळ स्वतः चा कौतुक कसे होईल ह्या कडे लक्ष देत आहे. पण सर्वापेक्षा वेगळाच उपक्रम राबविण्यात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) यांनी बाजी मारली आहे.

शिवसेनेचे विधान सभा सह संघटक रूपेश भोईर यांनी दोन दिवसाचा भव्य रोजगार शिबीर आयोजित केलेला आहे. पी एस एन सप्लाय चैन प्रा. लिमिटेड यांच्या माध्यमातून अमेझॉन कंपनीत जॉब साठी शिबीर चा आयोजन करण्यात आले आहे. मुख्य म्हणजे मूक बधीर लोकांना सुद्धा नोकरी मिळेल अशी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. 29 ऑगस्ट आणि4 सप्टेंबर रोजी आयोजित सदर रोजगार शिबीर बाबत माहिती देताना रूपेश भोईर यांनी सांगितलं की गणपति उत्सवात जर आम्ही काही गरजू लोकांना रोजगार देण्यात यशस्वी झालो तर आम्हाला वाटेल की गणपति बाप्पा ची भक्ती सफल झाली.सदरचा रोजगार शिबीर सर्वोदय मॉल येथे आयोजित करण्यात आला आहे. गरजू लोकांनी सकाळी दहा ते दुपारी दोन वाजेपर्यंत संपर्क करावे, असे आवाहन रूपेश भोईर यांनी केले आहे.

## कल्याण येथे ओबीसी महासंघाची बैठक संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण/4 सप्टेंबर पासून प्रत्येक तहसीलदार कार्यालया समोर साखळी उपोषण,कल्याण/मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे व इतर मागण्या करिता मनोज जरांगे मुंबई येथे आझाद मैदानात उपोषण सुरू केले आहे त्यामुळे, मराठा आरक्षण जोर धरु लागला आहे,त्या संदर्भात कल्याण तालुक्यातील ओबीसी महासंघ एकवटला असुन ओबीसी मधुन मराठा समाजाला आरक्षण देवु नये तसेच जातिनिहाय जनगणना




झाली पाहिजे ह्या प्रमुख दोन मागणी संदर्भात सरकारने लेखी आश्वासन द्यावे यासाठी संपूर्ण ठाणे जिल्ह्यात 4 सप्टेंबर पासून प्रत्येक तहसीलदार कार्यालया समोर साखळी उपोषण करण्यात येणार आहे हया बाबत बैठक घेण्यात आली.बैठकीला ओबीसी समाजाचे सुरेश पाटील, डॉ सुरेश खापरे, चंद्रकांत ठाणकर, विश्वनाथ जाधव, परशुराम पिंताबरे,, शत्रुघ्न भोईर,शनी आबांरे, वसंत भेरे, किशोर दिवटे, डॉ सुषमा बसवंत, मुकादम यांच्या सह ओबीसी बांधव उपस्थित होते,बैठकीत ओबीसींच्या नेत्यांनी मार्गदर्शन केले, ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागता कामा नये, तसेच सरकारने जातिनिहाय जनगणना केली पाहिजे ह्या प्रमुख दोन मागणी साठी 4सप्टेंबर पासून संपूर्ण ठाणे जिल्ह्यात तहसीलदार कार्यालया समोर साखळी उपोषण करण्यात येईल असे बैठकीत ठरविण्यात आले,

## टिटवाळ्यात तरुणीची आत्महत्या

### ब्लॅकमेलर समोरच संपवले जीवन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण -** टिटवाळयामध्ये एका तरुणाने समाज माध्यमातून एका २३ वर्षाच्या तरुणीशी मैत्री केली. तिचा विश्वास संपादन करून तिच्याकडून विविध कारणे सांगून सोन्याचे दागिने ताब्यात घेतले. हे दागिने तरुणी परत मागायला लागली. तेव्हा तो तरुणीला ब्लॅकमेल करू लागला. अखे या तरुणाच्या त्रासाला कंटाळून तरुणीने दृश्यध्वनी चित्रणाच्या माध्यमातून तरुणाला संपर्क करून आपल्या राहता घराच्या गच्चीवर जाऊन जीवन संपवले.

टिटवाळा पोलीस ठाण्यात मयत तरुणीच्या कुटुंबियांनी याप्रकरणी तक्रार दाखल केली आहे. काही घडले नसताना अचानक मुलीने आत्महत्या केल्याने कुटुंबीय हादरले. गोवेली येथील शासकीय रुग्णालयात तरुणीला नेण्यात आले. पण तिथे डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. या मुलीचा मोबाईल तपासल्या नंतर तिचा संपर्क ऋतिक रोहणे या तरुणांवर होता असे निष्पन्न झाले. या प्रकरणाची माहिती पोलिसांना देण्यात आली.

## पडघ्यातील 'वैश्य युवक' गणेशोत्सव मंडळांचे ८६ व्या वर्षात पदार्पण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा दि. ३१ / राजेश दळवी**

भिवंडी तालुक्यातील स्वातंत्र्योत्तर काळात स्थापन झालेला पडघा येथील "वैश्य युवक" गणेशोत्सव मंडळांचा ८६ व्या वर्षात पदार्पण झाल्याने मंडळाच्या कार्यकर्त्यांत उत्साहाचे वातावरण आहे.

१९४० साली वैश्य युवक गणेशोत्सव मंडळाची स्थापना करण्यात आली असुन यावर्षी मंडळाचे ८६ वे वर्ष असुन अनेक वर्षाची परंपरा जोपासत "वैश्य युवक "गणेशोत्सव मंडळ प्रत्येक वर्षी उत्साहात गणेशोत्सव साजरा करीत आहे. यावर्षीही वाणी आळी येथील श्री लक्ष्मी नारायण मंदीरात आकर्षक रोषणाई, सजावट करून आकर्षक गणेश



मुर्तीची स्थापना करण्यात आली असुन दर्शनासाठी नागरीकांची रीघ लागली आहे. मंडळाच्या वतीने भजन, महाआरती व सत्यनारायणाची महापुजा असे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. स्थापना करण्यात आलेली सुबक मुर्ती ही समीर बिडवी यांच्या कडुन मंडळाला देण्यात आली असुन मुर्तीकार किरण तेलवणे यांनी आकर्षक मुर्ती घडवली असुन सजावट सांवत ब्रदर्स मंडप डेकोरेटर्स यांनी केली आहे. तर सरपंच रविंद्र विशे उपसरपंच मयुरेश गंधे ग्रामपंचायत सदस्य व परिसरातील विविध मान्यवरांनी मंडळाला भेट देऊन गणपंतीचे दर्शन घेतले. यावेळी विवीध मान्यवरांना मंडळाच्या वतीने पुष्पगुच्छ, शाल, झाड देऊन सन्मानीत करण्यात आले हा गणेशोत्सव यशस्वी करण्यासाठी "वैश्य युवक" गणेशोत्सव मंडळाचे सर्व सदस्य, कार्यकर्ते मेहनत घेत आहेत.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024